श्री शारदा भवन शिक्षा संस्था, नांदेड़ संचलित

# यशवंत महाविद्यालय, नांदेड

# यशवंत प्रबोधन व्याख्यानाला

# (2022-23)

## समन्वयक

## डॉ. संदीप एस. पाईकराव

# यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समिती

# 2022-23


Shri Sharada Bhavan Education Society's

**YESHWANT MAHAVIDYALAYA, NANDED-431602(M.S.)**

(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)

**NAAC Reaccredited "A" Grade (III[rd] Cycle)**

**'COLLEGE WITH POTENTIAL FOR EXCELLENCE STATUS'**

**UG**-Arts, Science,Commerce, B.Sc.(C.S.), B.Sc.(B.T.), **PG**-Economics, History, English, Sociology, M.Com., Chemistry, Zoology, Environmental Science, Microbiology, Computer Science, Dairy Science, MCM, Information Technology, Biotechnology, Electronics,Botany, PG Diploma in Tax Procedure & Practice, PG Diploma in Electronics/Embedded System Design, **Research Center**in Biotechnology, Botany & Horticulture, Chemistry, Commerce, Computer Science & Information Technology, Dairy Science, Economics, Electronics, English, Environmental Science, Hindi, History, Marathi, Mathematics & Statistics, Microbiology, Political Science, Physics, Urdu & Zoology)

**Establishment Year: 1963**

| **Hon'ble Shri Ashokrao Chavan** | **Shri D.P.Savant** | **Dr.Ganeshchandra Shinde** |
|---|---|---|
| **President** | **Secretary** | **Principal** |

Phone No.s:- (02462) 254170, 254487(Office), 253726(Fax)

**website:** www.ymnnanded.in **Email:** principalymn@gmail.com


**Ref.No.: YMN/2022-2023/** **Date: 08.08.2022**

## OFFICE ORDER

## YESHWANT PRABHODAN VYAKHYANMALA COMMITTEE

The following faculty of the senior college are hereby informed that the **Yeshwant Prabhodan Vyakhyanmala Committee** has been re-constituted for the smooth functioning of the respective activities run under IQAC of thecollege.

| | | |
|---|---|---|
| 1. | Dr. S. S. Paikrao | Chairman |
| 2. | Dr. Mrs.KavitaSonkamble | Member |
| 3. | Dr. Mrs. MeeraV.Phad | Member |
| 4. | Dr. PopulwadD.A. | Member |
| 5. | Mr. G.S.Duthade | Member |
| 6. | Dr. K. N.Wadje(Librarian) | Member |

The committee is informed that the annual report of the overall activities undertaken by the committee is to be prepared atthe end of the every academic year and a copy of the report is to be submitted to the internal Quality Assurance Cell (IQAC) office. For any sort of assistance for deciding the policies, the committee should feel free to approach the IQAC Office.

PRINCIPAL
Yeshwant Mahavidyalaya
NANDED.

Principal

Copy to:

| | | |
|---|---|---|
| 1. | Dr. S. S. Paikrao | Chairman |
| 2. | Dr. Mrs.KavitaSonkamble | Member |
| 3. | Dr. Mrs. MeeraV.Phad | Member |
| 4. | Dr. PopulwadD.A. | Member |
| 5. | Mr. G.S.Duthade | Member |
| 6. | Dr. K. N.Wadje(Librarian) | Member |

## उद्देश : (Objectives)

- **थोर महापुरुशाच्या विचारांचा वारसा जतन करणे.**
- **थोर महापुरुशाच्या विचारांचा जागर करणे.**
- **विद्यार्थ्यां मध्ये नेतृत्व गुण विकसित करणे.**
- **विद्यार्थ्यां मध्ये सामाजिक समतेची बीजारोपण करणे.**
- **विद्यार्थ्यां मध्ये सामाजिक सहिष्णुता निर्माण करणे.**
- **विद्यार्थ्यां मध्ये सामाजिक कर्तव्याची जाणीव निर्माण करणे.**

## Activities of the Committee:

- **विशेष व्याख्यान** (दि.२३ सप्टेंबर, २०२२)

**'प्रतिभेचा हिमालय : अण्णाभाऊ साठे'**

**- श्री शिवा कांबळे**

यशवंत महाविद्यालयात 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला' समिती तर्फे दि.२३ सप्टेंबर रोजी रोजी दुपारी बारा वाजता ग्रंथालयातील सेमिनार हॉलमध्ये प्रसिद्ध साहित्यिक व राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री शिवा कांबळे यांचे 'प्रतिभेचा हिमालय : अण्णाभाऊ साठे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन. शिंदे होते तर डॉ. संदीप पाईकराव, डॉ. कविता सोनकांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य के.आर.रबडे, महाविद्यालयाचे प्रबंधक संदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले.

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे समग्र साहित्य मानवाच्या कल्याणाचा विचार करणारे असून या संपूर्ण साहित्यातून स्वातंत्र्य , समता, बंधुता आणि न्याय हे मूल्य प्रकर्षाने जाणवतात. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे मानवतावादाचा पुरस्कार करणारे साहित्य असून या साहित्याने सामान्य माणसाला जगायला बळ दिले असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा

भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवा कांबळे यांनी केले.

पुढे बोलताना शिवा कांबळे म्हणाले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रज्ञा आणि प्रतिभा अलौकिक अशी होती. त्या प्रज्ञा आणि प्रतिभेचा प्रत्यय अण्णाभाऊंनी आपल्या सबंध साहित्यकृतीतून आणून दिला असून अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे विज्ञानवाद , मानवतावाद आणि समाजवादाचा पुरस्कार करणारे असल्याचे मतही शिवा कांबळे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे म्हणाले की , अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने मानवी कल्याणाचा विचार करत मानवी जीवन मूल्यांची शिकवण दिलेली आहे.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भित्तीपत्रकाचे विमोचन शिवा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रंथालय परिसरात मान्यवरांच्या उपस्थितीत शिवा कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मिरा फड यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ. कैलास वडजे यांनी मानले.

यावेळी प्रा.गौतम दुथडे , डॉ. डी. ए. पुपलवाड, डॉ.अजय गव्हाणे, डॉ. विश्वाधार देशमुख , डॉ. साईनाथ शाहू, डॉ. संदीप खानसोळे, डॉ. नीता जयस्वाल, डॉ. भरत कांबळे, डॉ. विजय भोसले, डॉ.संजय जगताप, डॉ.सुनील जाधव, प्रा.जी.एल.सूर्यवंशी, डॉ. संभाजी वर्ताळे, एच.पी.कांबळे, विश्वनाथ गाडेकर, प्रा. उत्तम केंद्रे , प्रा. अर्जुन राऊत , संजय भोळे आदींसह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.






यशवंत महाविद्यालय, नांदेड.












यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला
समिती द्वारा आयोजित







देशोन्नती

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य मानवतावादाचा पुरस्कार करणारे

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे समग्र साहित्य मानवाच्या कल्याणाचा विचार करणारे असून या संपूर्ण साहित्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हे मूल्य प्रकर्षाने जाणवतात. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे मानवतावादाचा पुरस्कार करणारे साहित्य असून या साहित्याने सामान्य माणसाला जगायला बळ दिले असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवा कांबळे यांनी केले.

यशवंत महाविद्यालयात यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेतर्फे २३ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ



मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र. कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे होते तर डॉ. संदीप पाईकराव, डॉ. कविता सोनकांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचाय के.आर.रबडे,महाविद्यालयाचे प्रबंधक संदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले.

पुढे बोलताना शिवा कांबळे म्हणाले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची प्रज्ञा आणि प्रतिभा अलौकिक अशी होती. त्या प्रज्ञा आणि प्रतिभेचा प्रत्यय अण्णाभाऊंनी आपल्या सबंध साहित्यकृतीतून आणून दिला असून अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे विज्ञानवाद, मानवतावाद आणि समाजवादाचा पुरस्कार करणारे असल्याचे मतही शिवा कांबळे यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे म्हणाले की, अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याने मानवी कल्याणाचा विचार करत मानवी जीवन मूल्यांची शिकवण दिली आहे. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भित्तीपत्रकाचे विमोचन शिवा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रंथालय परिसरात मान्यवरांच्या उपस्थितीत शिवा कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. मिरा फड यांनी तर आभार ग्रंथपाल डॉ.कैलास वडजे यांनी मानले.

यावेळी प्रा.गौतम दुधडे, डॉ. डी. डी. पुपलवाड, डॉ. अजय गव्हाणे, डॉ. विश्वाधार देशमुख, डॉ. साईनाथ शाहू, डॉ. संदीप खानसोळे, डॉ. नीता जयस्वाल, डॉ. भरत कांबळे, डॉ. विजय भोसले, डॉ. संजय जगताप, डॉ.सुनील जाधव, प्रा. जी. एल.सूर्यवंशी, डॉ.संभाजी वर्ताळे, एच. पी. कांबळे,विश्वनाथ गाडेकर, प्रा.उत्तम केंद्रे, आदींची उपस्थिती होती.

Deshonnati Edition
Sep 27, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

दैनिक सत्यप्रभा

रविवार, दि.२५ सप्टेंबर २०२२

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे मानवतावादाचे पुरस्कर्ते-शिवा कांबळे



**नांदेड,दि.२४ (प्रतिनिधी)**- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे समग्र साहित्य मानवाच्या कल्याणाचा विचार करणारे असून या संपूर्ण साहित्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हे मूल्य प्रकर्षाने जाणवतात. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे मानवतावादाचा पुरस्कार करणारे साहित्य असून या साहित्याने सामान्य माणसाला जगायला बळ दिले असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवा कांबळे यांनी केले. यशवंत महाविद्यालयात यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेतर्फे दि.२३ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन.शिंदे होते तर डॉ.संदीप पाईकराव,डॉ. कविता सोनकांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य के. आर.रबडे,महाविद्यालयाचे प्रबंधक संदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कविता सोनकांबळे यांनी केले. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भित्तीपत्रकाचे विमोचन शिवा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रंथालय परिसरात मान्यवरांच्या उपस्थितीत शिवा कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मीरा फड यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ.कैलास वडजे यांनी मानले.यावेळी प्रा.गौतम दुथडे, डॉ. डी.डी.पुपलवाड,डॉ.अजय गव्हाणे, डॉ.विश्वाधार देशमुख,डॉ.साईनाथ शाहू,डॉ. संदीप खानसोळे, डॉ. विजय भोसले, डॉ.संजय जगताप, डॉ.सुनील जाधव, प्रा.जी. एल.सूर्यवंशी, एच. पी. कांबळे, विश्वनाथ गाडेकर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे मानवतावादाचे पुरस्कार्ते : शिवा कांबळे



नांदेड : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य मानवाच्या कल्याणाचा विचार करणारे असून या संपूर्ण साहित्यातून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय हे मूल्य प्रकर्षाने जाणवतात. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे मानवतावादाचा पुरस्कार करणारे साहित्य असून या साहित्याने सामान्य माणसाला जगायला बळ दिले असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य तथा राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक शिवा कांबळे यांनी केले.

यशवंत महाविद्यालयात यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेतर्फे दि.२३ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे होते तर डॉ.संदीप पाईकराव,डॉ.कविता सोनकांबळे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य के.आर.रबडे,महाविद्यालयाचे प्रबंधक संदीप पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. पान ४ वर ➢➢

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा...

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले. पुढे बोलताना शिवा कांबळे म्हणाले की, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची प्रज्ञा आणि प्रतिभा अलौकिक अशी होती. त्या प्रज्ञा आणि प्रतिभेचा प्रत्यय अण्णाभाऊंनी आपल्या सबंध साहित्यकृतीतून आणून दिला असून अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे विज्ञानवाद, मानवतावाद, समाजवाद आणि आंबेडकरवादाचा पुरस्कार करणारे असल्याचे मतही शिवा कांबळे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे म्हणाले की, अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याने मानवी कल्याणाचा विचार करत मानवी जीवन मूल्यांची शिकवण दिलेली आहे. याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भित्तीपत्रकाचे विमोचन शिवा कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर ग्रंथालय परिसरात मान्यवरांच्या उपस्थितीत शिवा कांबळे यांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.मिरा फड यांनी केले तर आभार ग्रंथपाल डॉ.कैलास वडजे यांनी मानले.यावेळी प्रा.गौतम दुथडे, डॉ. डी.डी.पुपलवाड, डॉ.अजय गव्हाणे, डॉ. विश्वाधार देशमुख, डॉ.साईनाथ शाहू, डॉ. संदीप खानसोळे, डॉ.विजय भोसले, डॉ.संजय जगताप, डॉ.सुनील जाधव, प्रा.जी.एल.सूर्यवंशी, एच.पी.कांबळे, विश्वनाथ गाडेकर यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## विशेष व्याख्यान (दि.०६ डिसेम्बर, २०२२)

### "आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान"

**- डॉ. डी एच मेहत्रे**

यशवंत महाविद्यालयात 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमा ला' समिती तर्फे दि. 06/12/2022 रोजी दुपारी बारा वाजता इंग्रजी भाषा प्रयोगशाला येथे डॉ. डी एच मेहत्रे , राज्यशास्त्र विभाग प्रमुख , राजीव गांधी महाविद्यालय , मुदखेड यांचे "आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान" या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन. शिंदे होते तर मंचावर उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे, उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, महाविद्यालयाचे प्रबंधक संदीप पाटील व डॉ. संदीप पाईकराव यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले.

संपूर्ण जग संक्रमणाच्या प्रकियेतून जातांना अनेक देशात अस्थैर्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आशिया खंडातील अनेकानेक देशांमध्ये अराजकता निर्माण झाली असून देश फुटीच्या उंबरठ्यावर उभे आहेत.अशा अस्थिर काळात धर्म, पंथ, भाषा,परंपरा आणि संस्कृती याबाबतीत कमालीची विविधता असणाऱ्या भारतातील राष्ट्रीय एकात्मता आणि राजकीय स्थैर्य हे जगभरातील अभ्यासकांसाठी कुतूहलाचा विषय बनले असून त्याचे गमक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कार्यात सामावले आहे;असे प्रतिपादन राजीव गांधी महाविद्यालय,मुदखेड येथील राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा राजकीय घडामोडींचे अभ्यासक डॉ.दत्ताजी मेहेत्रे यांनी केले.

ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त यशवंत महाविद्यालयात आयोजित 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमाले'त प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

डॉ. मेहेत्रे पुढे बोलताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधान निर्माते असल्यामुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी साध्य झाल्या. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षांत आर्थिक विषमता संपली नाही तरी संविधान आणि लोकशाही यावरील 'नाही रे' वर्गाचा विश्वास अबाधित आहे आणि हे संविधान डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले असल्यामुळे त्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, अशी दलितांची भावना बनलेली आहे. यामुळे अनेकानेक देशांमध्ये अस्थिरता वाढत असताना भारतात मात्र राजकीय स्थैर्य अबाधित असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदवले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरानी मानवी कल्याणाचा विचार करत मानवी जीवन मूल्यांची शिकवण दिलेली आहे. त्यासोबतच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी ग्रंथालय वापराविषयी सांगितलेल्या नियमांचा उल्लेख केला.

प्रास्ताविक महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ.मिरा फड व आभार डॉ.डी.ए.पुपलवाड यांनी मानले.

यावेळी प्रा. गौतम दुथडे, डॉ.श्रीरंग बोडके, डॉ.कैलास वडजे, डॉ.अजय गव्हाणे,डॉ.विश्वाधार देशमुख, डॉ.साईनाथ शाहू, डॉ.संदीप खानसोळे, डॉ. नीता जयस्वाल, डॉ.भरत कांबळे, डॉ.शिवराज बोकडे, डॉ.विजय भोसले, डॉ.संजय जगताप, डॉ.सुनील जाधव, प्रा.जी.एल.सूर्यवंशी, डॉ.संभाजी वर्ताळे, एच.पी.कांबळे, विश्वनाथ गाडेकर, प्रा.उत्तम केंद्रे, प्रा.अर्जुन राऊत, संजय भोळे आदींसह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.




यशवंत महाविद्यालय, नांदेड.
यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला
समिती द्वारा आयोजित
GPS Map Camera
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Lat 19.170187°
Long 77.309047°
06/12/22 01:02 PM GMT +05:30
Google


यशवंत महाविद्यालय, नांदेड.
यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला
समिती द्वारा आयोजित
GPS Map Camera
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Lat 19.170185°
Long 77.309044°
06/12/22 12:38 PM GMT +05:30
Google


यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला
समिती द्वारा आयोजित
GPS Map Camera
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Lat 19.170198°
Long 77.309052°
06/12/22 12:29 PM GMT +05:30
Google







उद्याचा मराठवाडा

# राष्ट्रीय एकात्मतेत डॉ. आंबेडकरांच्या विचारांचे योगदान

नांदेड (प्रतिनिधी) - संपूर्ण जग संक्रमणाच्या प्रकियेतून जातांना अनेक देशात अस्थैर्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आशिया खंडातील अनेकानेक देशांमध्ये अराजकता निर्माण झाली असून देश फुटीच्या उंबरठ्यावर उभा आहे. अशा अस्थिर काळात धर्म, पंथ, भाषा, परंपरा आणि संस्कृती याबाबतीत कमालीची विविधता असणाऱ्या भारतातील राष्ट्रीय एकात्मता आणि राजकीय स्थैर्य हे जगभरातील अभ्यासकांसाठी कुतुहलाचा विषय बनले असून त्याचे गमक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कार्यात सामावले आहे, असे प्रतिपादन राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख तथा राजकीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. दत्ताजी मेहेत्रे यांनी केले. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त यशवंत महाविद्यालयात आयोजित 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमाले'त प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे होते, तर मंचावर उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे व डॉ. हरिश्चंद्र पतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. मेहेत्रे पुढे बोलतांना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधान निर्माते असल्यामुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी साध्य झाल्या. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षांत आर्थिक विषमता संपली नाही तरी संविधान आणि लोकशाही यावरील 'नाही रे' वर्गाचा विश्वास अबाधित आहे आणि हे संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेले असल्यामुळे त्याच्या संरक्षणाची जबाबदारी आपल्यावर आहे, अशी दलितांची भावना बनलेली आहे. यामुळे अनेकानेक देशांमध्ये अस्थिरता वाढत असतांना भारतात मात्र राजकीय स्थैर्य अबाधित असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. गणेशचंद्र एन. शिंदे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मानवी कल्याणाचा विचार करीत मानवी जीवन मूल्यांची शिकवण दिलेली आहे. त्यासोबतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ग्रंथालय वापराविषयी सांगितलेल्या नियमांचा उल्लेख केला.

प्रास्ताविक महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. कविता सोनकांबळे यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. मीरा फड व आभार डॉ. डी.डी. पुपलवाड यांनी मानले.

यावेळी प्रा. गौतम दुथडे, डॉ. श्रीरंग बोडके, डॉ. कैलास वडजे, डॉ. अजय गव्हाणे, डॉ. विश्वाधार देशमुख, डॉ. साईनाथ शाहू, डॉ. संदीप खानसोळे, डॉ. नीता जयस्वाल, डॉ. भरत कांबळे, डॉ. शिवराज बोकडे, डॉ. विजय भोसले, डॉ. संजय जगताप, डॉ. सुनील जाधव, प्रा. जी.एल. सूर्यवंशी, डॉ. संभाजी वर्ताळे, एच.पी. कांबळे, विश्वनाथ गाडेकर, प्रा. उत्तम केंद्रे, प्रा. अर्जुन राऊत, संजय भोळे आदींसह महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची बहुसंख्येने उपस्थिती होती.

Main Edition
Dec 23, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

देशोन्नती

# एकात्मता व राजकीय स्थैर्य यामध्ये डॉ.आंबेडकरांच्या विचारकार्याचे मोठे योगदान - डॉ.मेहेत्रे

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ संपूर्ण जग संक्रमणाच्या प्रकियेतून जातांना अनेक देशात अस्थैर्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आशिया खंडातील अनेकानेक देशांमध्ये अराजकता निर्माण झाली असून हे देशफुटीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. अशा जगातील अस्थिर काळात धर्म, पंथ, भाषा, परंपरा आणि संस्कृती याबाबतीत कमालीची विविधता असणाऱ्या भारतातील राष्ट्रीय एकात्मता आणि राजकीय स्थैर्य हे जगभरातील अभ्यासकांसाठी कुतूहलाचा विषय बनले असून त्याचे गमक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कार्यात सामावले आहे' असे




प्रतिपादन राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील राज्यशास्त्राचे प्राध्यापक तथा राजकीय घडामोडींचे अभ्यासक डॉ. दत्ताजी मेहेत्रे यांनी केले. ते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त यशवंत महाविद्यालय, नांदेड येथे आयोजित 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमाले'त प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेशचंद्र शिंदे हे होते. विचारमंचावर उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे व डॉ.हरिश्चंद्र पतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.मेहेत्रे पुढे बोलताना म्हणाले की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे संविधान निर्माते असल्यामुळे दोन महत्त्वाच्या गोष्टी साध्य झाल्या. स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तर वर्षांत आर्थिक विषमता संपली नाही तरी संविधान आणि लोकशाही यावरील 'नाही रे' वर्गाचा विश्वास अबाधित आहे.

Nanded Edition
Dec 23, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

नांदेड शहर

प्रजावाणी ■ शनिवार, दि. २४ डिसेंबर २०२२ ■ ५

# भारतातील राष्ट्रीय एकात्मता आणि राजकीय स्थैर्यामध्ये डॉ. आंबेडकरांचे विचार व कार्याचे योगदान : डॉ. मेहेत्रे

नांदेड, दि.२३ : संपूर्ण जग संक्रमणाच्या प्रक्रियेतून जाताना अनेक देशात अस्थैर्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. आशिया खंडातील अनेकानेक देशांमध्ये अराजकता निर्माण झाली असून देश फुटीच्या उंबरठ्यावर उभे आहेत. अशा अस्थिर काळात धर्म, पंथ, भाषा,परंपरा आणि संस्कृती याबाबतीत कमालीची विविधता असणाऱ्या भारतातील राष्ट्रीय एकात्मता आणि राजकीय स्थैर्य हे जगभरातील अभ्यासकांसाठी कुतूहलाचा विषय बनले असून त्याचे गमक डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचार आणि कार्यात सामावले आहे, असे प्रतिपादन राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड येथील राज्यशास्त्र विभागप्रमुख तथा राजकीय घडामोडींचे अभ्यासक डॉ.दत्ताजी मेहेत्रे यांनी केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या



महापरिनिर्वाणदिनानिमित्त यशवंत महाविद्यालयात आयोजित 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमाले'त प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन. शिंदे होते तर मंचावर उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे व डॉ. हरिश्चंद्र पतंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. मीरा फड व आभार डॉ. डी. डी. पुपलवाड यांनी मानले. यावेळी प्रा.गौतम दुथडे, डॉ.श्रीरंग बोडके, डॉ.कैलास वडजे, डॉ.अजय गव्हाणे, डॉ.विश्वाधार देशमुख, डॉ.साईनाथ शाहू, डॉ.संदीप खानसोळे, डॉ.नीता जयस्वाल, डॉ.भरत कांबळे, डॉ.शिवराज बोकडे, डॉ.विजय भोसले, डॉ.संजय जगताप, डॉ.सुनील जाधव, प्रा.जी. एल. सूर्यवंशी, डॉ.संभाजी वर्ताळे, एच. पी. कांबळे, विश्वनाथ गाडेकर, प्रा.उत्तम केंद्रे, प्रा.अर्जुन राऊत, संजय भोळे आदींसह विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## विशेष व्याख्यान (दि. १७ फेब्रुवारी, २०२३)

# विषय - श्री गुरु गोविंद सिंह जी का जीवन कार्य

### - डॉ.परविंदर कौर महाजन

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित यशवंत महाविद्यालय, नांदेड येथील यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समिती व हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्री गुरु गोविंद सिंह यांचे जीवन व कार्य' या विषयावर विशेष व्याख्यान दिनांक १७ फेब्रुवारी , शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आले होते.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालय , नांदेड येथील हिंदी विभागप्रमुख डॉ. परविंदरकौर महाजन या उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते श्री.गुरु गोविंद सिंहजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

'श्री गुरु गोविंद सिंह यांचे जीवन व कार्य ' या विषयावर बोलत असताना डॉ. परविंदर कौर यांनी श्री गुरु गोविंद सिंह यांच्या जीवनातील विविध प्रसंग व गुरु ग्रंथ साहिब ग्रंथाचे महत्त्व पटवून सांगितले.

डॉ.परविंदर कौर पुढे बोलताना म्हणाल्या की , भारतीय इतिहासामध्ये स्वधर्म व स्वदेश रक्षणासाठी श्री गुरुगोविंद सिंह यांनी केलेले त्याग आणि बलिदान अद्वितीय आहे. खालसा पंथाची स्थापना व पंचप्यारे यांच्या माध्यमातून भारतीय समाजामध्ये सामाजिक समता स्थापन करण्यासाठी तसेच समाजातील श्रेष्ठ कनिष्ठ भेदभाव दूर करण्यासाठी श्री गुरु गोविंद सिंह यांनी देह धारी गुरुपरंपरा संपुष्टात आणून जगाच्या इतिहासात पहिल्यांदा गुरुच्या गादीवर श्री गुरु ग्रंथ साहेब या पवित्र ग्रंथास विराजमान केले. जोपर्यंत हे ब्रह्मांड असेल तोपर्यंत गुरु ग्रंथ साहेब हेच गुरु असतील.


याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ , नांदेडचे माजी प्र. कुलगुरू तथा विद्यमान प्राचार्य डॉ.गणेशचंद्र एन.शिंदे यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे हे होते. आणि मंचावर डॉ.मीरा फड , डॉ.संदीप पाईकराव यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी हिंदी विभागातर्फे घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना पुरस्कार व प्रमाणपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे म्हणाल्या की , यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेच्या अशा वेगवेगळया व्याख्यानातून महापुरुषांच्या कार्यांचा व योगदारांचा जागर केला जातो विद्यार्थ्यांनी यातून बोध घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल केली पाहिजे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.ज्योती मुंगल यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. सुनील जाधव व आभार डॉ.साईनाथ शाहू यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद , शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.


SHOT ON MI 10I | DR.SHAHU S G
17/02/2023 10:34


GPS Map Camera
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169941°
Long 77.309197°
17/02/23 10:38 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169944°
Long 77.309203°
17/02/23 10:41 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169912°
Long 77.309241°
17/02/23 10:49 AM GMT +05:30
Google


GPS Map Camera
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169887°
Long 77.309225°
17/02/23 10:50 AM GMT +05:30
Google


GPS Map Ca
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar,
Maharashtra 431602, India
Lat 19.169921°
Long 77.309213°
17/02/23 10:52 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169925°
Long 77.309213°
17/02/23 10:52 AM GMT +05:30


शोध-ऋतु
राष्ट्रीय
अवार्ड समारोह
GPS Map Camera
Google
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169932°
Long 77.309211°
17/02/23 10:53 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169947°
Long 77.309194°
17/02/23 11:05 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169973°
Long 77.309276°
17/02/23 11:44 AM GMT +05:30


GPS Map Camera
Google
Nanded, Maharashtra, India
5895+RJ4, Bhagya Nagar Road, Vishnu Nagar, Nanded,
Maharashtra 431602, India
Lat 19.169981°
Long 77.3092°
17/02/23 11:49 AM GMT +05:30

पुण्य नगरी

# श्री गुरुगोविंदसिंघजींच्या जीवनकार्यावर व्याख्यान संपन्न

**नांदेड/ प्रतिनिधी**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित यशवंत महाविद्यालय, नांदेड येथील यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समिती व हिंदी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'श्री गुरु गोविंद सिंह यांचे जीवन व कार्य' या विषयावर शुक्रवारी विशेष व्याख्यान झाले.

यावेळी एनएसबी कॉलेजच्या हिंदी विभागप्रमुख डॉ. परविंदरकौर महाजन उपस्थित होत्या. मान्यवरांच्या हस्ते श्री.गुरु गोविंदसिंघ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.डॉ.परविंदरकौर यांनी श्री गुरु गोविंदसिंघजी यांच्या जीवनातील विविध प्रसंग व गुरु ग्रंथ साहिब ग्रंथाचे महत्त्व पटवून सांगितले. भारतीय इतिहासामध्ये स्वधर्म व स्वदेश रक्षणासाठी श्री गुरुगोविंदसिंघजी यांनी केलेला त्याग आणि बलिदान अद्वितीय आहे. खालसा पंथाची स्थापना व पंचप्यारे यांच्या माध्यमातून भारतीय समाजामध्ये सामाजिक समता स्थापन करण्यासाठी तसेच समाजातील श्रेष्ठ, कनिष्ठ भेदभाव दूर करण्यासाठी श्री गुरु गोविंदसिंघजी यांनी देह धारी गुरुपरंपरा संपुष्टात आणून गुरुंच्या गादीवर श्री गुरु ग्रंथ साहेब या पवित्र ग्रंथास विराजमान केले. जोपर्यंत हे ब्रह्मांड असेल तोपर्यंत गुरु ग्रंथ साहेब हेच गुरु असतील असे गुरुगोविंद महाराजांनी सांगितले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे या होत्या. मंचावर डॉ.मीरा फड,डॉ.संदीप पाईकराव यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षीसे व प्रमाणपत्रांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.



यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेच्या अशा वेगवेगळ्या व्याख्यानातून महापुरुषांच्या कार्यांचा गौरव केला जातो. यातून विद्यार्थ्यांनी बोध घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल केली पाहिजे. डॉ.ज्योती मुंगल यांनी प्रास्तविक केले. डॉ. सुनील जाधव यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.साईनाथ शाहू यांनी आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

Nanded Edition
Feb 21, 2023 Page No. 06

## विशेष व्याख्यान (दि. २० फेब्रुवारी, २०२३)

### शिवराय संस्कार, शिक्षण, स्वराज्य आणि आजचा युवक

### प्रमुख वक्ते - डॉ नामदेव दळवी

आज दिनांक २०/०२/२०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला आयोजित यशवंत महाविद्यालय नांदेड येथील ग्रंथालय सभागृहामध्ये जयंती दिनाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात प्रा. डॉ. नामदेव दळवी यांनी वरील उद्गार काढले. छत्रपती शिवरायांचे कार्य व त्यांच्यावर झालेले संस्कार त्या संस्कारातून महाराजांनी निर्माण केलेली स्वराज्य याचा आदर्श आजच्या युवकांनी घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी असे त्यांनी आवाहन केले. छत्रपती शिवरायांवर झालेल्या संस्कारांमुळेच महाराष्ट्र हा पुरोगामी व वैचारिक स्वातंत्र्य बहाल करणारे राज्य ठरला आहे. छत्रपती शिवरायांपासूनच शहीद भगतसिंग यांनी प्रेरणा घेऊन स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. याची आठवणही त्यांनी यानिमित्ताने करून दिली. छत्रपती शहाजीराजे भोसले व राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या संस्कारामुळे मातेचे स्वप्न पूर्ण करण्याचे अफाट कार्य शिवरायांनी या महाराष्ट्रात केले. त्या पराक्रमाचा सामर्थ्याचा वापर विद्यार्थ्यांनी आपल्या

जीवनात करून उद्यमशीलता ,कल्पकता, स्त्री औदार्य, धर्मनिरपेक्षता , निःपक्षपातीपणा ,सहिष्णुता या गुणवैशिष्ट्यामुळे महाराजांचे चरित्र आदर्शवत आहे. विश्व पातळीवर छत्रपती शिवाजी महाराजांसारखा महाप्रतापी राजा दुसरा झाला नाही. असेही ते बोलताना म्हणाले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोधन व्याख्यानमालेच्या सदस्य उपप्राचार्या डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले. त्यांनी प्रबोधन व्याख्यानमालेच्या आयोजनामाची भूमिका या निमित्ताने व्यक्त केली. याप्रसंगी कुमारी अंजली उबाळे या विद्यार्थिनींनी पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली. अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचंद्र शिंदे यांनी केला. महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. यशवंत महाविद्यालय हे विद्यार्थी केंद्रित महाविद्यालय असल्यामुळे या महाविद्यालयातील विद्यार्थी हा नक्कीच शिवरायांचे संस्कार आपल्या जीवनी अंगिकारेल असे ते अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. ज्ञानेश्वर पपुलवाड यांनी केले.

यावेळी यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे सदस्य डॉक्टर जी. एस. दुथडे, डॉ. मिरा फड, डॉ. कैलास वडजे, डॉ. ज्ञानेश्वर पपुलवाड आदीसह कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी विद्यार्थिनी प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती.




GPS Map
Camera Lite
S3, S3, Yeshwant College Rd, Baba Nagar,
Nanded, Maharashtra 431602, India
Latitude
19.1726197 N
Longitude
77.3089289 E
Local 11:21:40 AM
GMT 05:51:40 AM
Altitude 371 meters
Monday, 20-02-2023


GPS Map Camera
Google
Nanded, Maharashtra, India
Near B & C Office, Govt, 58C4+VVH, Rest House Rd,
Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Lat 19.172049°
Long 77.307162°
20/02/23 12:35 PM GMT +05:30


SHOT ON MI 10I | DR.SHAHU S G
20/02/2023 11:26


SHOT ON MI 10I | DR.SHAHU S G
20/02/2023 11:34


GPS Map Camera
Google
Nanded, Maharashtra, India
Near B & C Office, Govt, 58C4+VVH, Rest House Rd,
Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Lat 19.17204°
Long 77.307148°
20/02/23 11:44 AM GMT +05:30


SHOT ON MI 10I | DR.SHAHU S G
20/02/2023 12:13

# युवकांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावेत–डॉ.दळवी

**नांदेड,दि.२० (प्रतिनिधी)–** छत्रपती शिवरायांचे कार्य व त्यांच्यावर झालेले संस्कार त्या संस्कारातून महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्याचा आदर्श आजच्या युवकांनी घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी;असे आवाहन प्रा.डॉ. नामदवे दळवी यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला यशवंत महाविद्यालय,येथील ग्रंथालय सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली होती त्याप्रसंगी ते बोलत होते. छत्रपती शिवरायांवर झालेल्या संस्कारांमुळेच महाराष्ट्र हा पुरोगामी व वैचारिक स्वातंत्र्य बहाल करणारे



राज्य ठरला आहे असेही प्रा.डॉ. दळवी म्हणाले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोधन व्याख्यानमालेच्या सदस्य उपप्राचार्या डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले याप्रसंगी कु.अंजली उबाळे या विद्यार्थिनींने पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ.गणेशचंद्र शिंदे यांनी केला. यशवंत महाविद्यालय हे विद्यार्थी केंद्रित महाविद्यालय असल्यामुळे या महाविद्यालयातील विद्यार्थी हा नक्कीच शिवरायांचे संस्कार आपल्या जीवनी अंगिकारेल;असे ते अध्यक्षीय समारोप करताना म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ.संदीप पाईकराव यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार डॉ. ज्ञानेश्वर पपुलवाड यांनी केले. यावेळी यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे सदस्य प्रा.जी.एस.दुथडे, डॉ.मिरा फड, डॉ.कैलास वडजे, डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड आदीसह कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्राध्यापक व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

---

मराठवाडा साथी

# युवकांनी शिवरायांचे विचार आत्मसात करावेत- डॉ. दळवी

**मराठवाडा साथी न्यूज**

**नांदेड ।** छत्रपती शिवरायांचे कार्य व त्यांच्यावर झालेले संस्कार त्या संस्कारातून महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य याचा आदर्श आजच्या युवकांनी घेऊन आपल्या जीवनाची वाटचाल करावी,शिवरायांचे विचार व संस्कार आजच्या युवकांनी आत्मसात करावेत. असे प्रतिपादन डॉ.नामदेव दळवी यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्ताने यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला आयोजित यशवंत महाविद्यालय,येथील ग्रंथालय सभागृहामध्ये प्रा.डॉ. दळवी यांनी वरील उद्गार काढले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्या डॉ.कविता सोनकांबळे यांनी केले . याप्रसंगी अंजली उबाळे या विद्यार्थिनींने पोवाडा सादर करून उपस्थितांची मने जिंकली.अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेशचंद्र शिंदे म्हणाले की,यशवंत महाविद्यालय हे विद्यार्थी केंद्रित महाविद्यालय असल्यामुळे या महाविद्यालयातील विद्यार्थी हा नक्कीच शिवरायांचे संस्कार आपल्या जीवनात अंगिकारेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संदीप पाईकराव यांनी केले.

AURANGABAD Edition
Feb 21, 2023 Page No. 2
Powered by : eReleGo.com

## विशेष व्याख्यान (दि. १५ एप्रिल, २०२३)

### “आंबेडकर वादात बुद्धिजीवी वर्गाची भूमिका”

### - डॉ. आदिनाथ इंगोले

यशवंत महाविद्यालयात 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला' समिती तर्फे दिनांक 15 एप्रिल, 2023 रोजी सकाळी 10 वाजून 30 मिनिटांनी इंग्रजी भाषा प्रयोगशाळा येथे डॉ. आदिनाथ इंगोले , सेवानिवृत्त प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख , गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय , पूर्णा यांचे 'आंबेडकर वादात बुद्धिजीवी वर्गाची भूमिका ' या विषयावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेशचन्द्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे ह्या होत्या. तर मंचावर या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे , महाविद्यालयाचे प्रबंधक श्री संदीप पाटील व यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची पूजन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 132 व्या जयंतीनिमित्त यशवंत महाविद्यालयात आयोजित यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत असताना डॉ. आदिनाथ इंगोले म्हणाले संपूर्ण जगात असे केवळ तीन महापुरुष आहे ज्यांचे तत्त्वज्ञान आंतरविरोधी नाही तर विज्ञानवादासी सुसंगत आहे. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक आहेत डॉ. आदिनाथ इंगोले पुढे बोलताना म्हणाले की मैत्रीपूर्ण जीवन समता, बंधुता, न्याय आणि लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मैत्री असेल तर समता व बंधुता स्थापित होईल आणि समता स्थापन झाली तर लोकशाहीचे मूल्य मजबूत होतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय समाजसत्तावादी तथा विज्ञानवादी भारत निर्माण करणे हे होते. परंतु सध्याच्या काळामध्ये ब्राह्मण्यवाद आणि भांडवलशाही हे लोकशाहीचे शत्रू म्हणून समोर येत आहेत तेव्हा बुद्धिजीवी वर्गाची भूमिका महत्त्वाची ठरते. समकालीन बुद्धिजीवी वर्गाची वर्गवारी करत असताना डॉ. इंगोले म्हणाले की जगातील कोणत्याही उज्वल चळवळीच्या नाशास मध्यमवर्गीय बुद्धिजीवी जबाबदार असतो. बुद्धिजीवी वर्गाचे प्रमुख दोन प्रकार असून पहिला बुद्धिजीवी आहे जो की आत्मकेंद्रित बनत चालला आहे. मी , माझा परिवार, माझा स्वार्थ यापुरताच तो मर्यादित आहे तर दुसरा बुद्धीजीवी वर्ग प्रज्ञावंत वर्ग आहे. ज्यांना समाजाची जाणीव आहे समाजाच्या तळागळातील जनतेविषयी आस्था आहे त्यांच्या कल्याणासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी सदैव प्रयत्नरत राहणारा हा बुद्धिजीवी वर्ग आहे. पुढे बोलताना ते म्हणाले डॉ. बाबासाहेब म्हणतात राजकारण वर्गीय जाणिवांचे असते. वर्गीय जाणिवेशिवाय राजकारण म्हणजे भोंदूगिरी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमी समाजवादाची बाजू घेतली आणि प्रखर राष्ट्रवाद देशासमोर मांडला 'मी प्रथमतः भारतीय आणि अंतिमतः ही भारतीय आहे ' हा बाबासाहेबांचा विचार विद्यार्थ्यांसमोर डॉ. आदिनाथ इंगोले यांनी मांडला.

अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे मॅडम म्हणाल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर समाजासाठी आणि देशासाठी झटत राहिले. आणि त्याचबरोबर त्यांनी आपला पतीधर्म, पिता धर्म तितक्याच सामर्थ्याने निभावला. याप्रसंगी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी रमाबाईच्या नावे लिहिलेल्या पत्राचे वाचन करून बाबासाहेबांचे पारिवारिक जीवन व पत्नी विषयी त्यांच्या मनात असलेल्या अपार प्रेमाची अनुभूती करून देत सभागृहास भावनाशील केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांनी केले तर सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय जगताप यांनी केले व आभार डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड यांनी मानले.


याप्रसंगी यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समितीचे सदस्य डॉ. गौतम दुथडे , डॉ. मिरा फड , डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड व महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद , शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.








GPS Map
Camera Lite
58F4+367, Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Latitude
19.1701622 N
Longitude
77.3089901 E
Local 12:07:27 PM
GMT 06:37:27 AM
Altitude 369 meters
Saturday, 15-04-2023


Department of English
GPS Map
Camera Lite
58F4+367, Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Latitude
19.1741429 N
Longitude
77.3046205 E
Local 11:22:45 AM
GMT 05:52:45 AM
Altitude 369 meters
Saturday, 15-04-2023


GPS Map
Camera Lite
58F4+367, Vishnu Nagar, Nanded, Maharashtra 431602, India
Latitude
19.1701623 N
Longitude
77.3089912 E
Local 12:21:38 PM
GMT 06:51:38 AM
Altitude 369 meters
Saturday, 15-04-2023



सत्यप्रभा रविवार,दि. १६ एप्रिल २०२३ शेवटचे पान

# विज्ञानवादी भारत हेच डॉ.आंबेडकरांचे ध्येय होते–डॉ.इंगोले

नांदेड,दि.१५ (प्रतिनिधी)– संपूर्ण जगात असे केवळ तीन महापुरुष आहे ज्यांचे तत्त्वज्ञान आंतरविरोधी नाही तर विज्ञानवादासी सुसंगत आहे. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक आहेत, असे प्रतिपादन डॉ. आदिनाथ इंगोले यांनी केले.

यशवंत महाविद्यालयात यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समिती तर्फे इंग्रजी भाषा प्रयोगशाळा येथे सेवानिवृत्त प्राध्यापक डॉ. आदिनाथ इंगोले, यांचे आंबेडकर वादात बुद्धिजीवी वर्गाची भूमिका या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे ह्या होत्या. तर मंचावर उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, महाविद्यालयाचे प्रबंधक संदीप पाटील व यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांची उपस्थिती होती. डॉ. आदिनाथ इंगोले पुढे बोलताना म्हणाले की मैत्रीपूर्ण जीवन समता, बंधुता, न्याय आणि लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मैत्री असेल तर समता व बंधुता स्थापित होईल आणि समता स्थापन झाली तर लोकशाहीचे मूल्य मजबूत होतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय समाजसत्तावादी तथा विज्ञानवादी भारत निर्माण करणे हे होते अशी भूमिका त्यांनी मांडली.

अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे म्हणाल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर समाजासाठी आणि देशासाठी झटत राहिले. आणि त्याचबरोबर त्यांनी आपला पतीधर्म, पिता धर्म तितक्याच सामर्थ्याने निभावला. या



प्रसंगी त्यांनी रमाबाईंच्या नावे डॉ.आंबेडकर यांनी लिहिलेल्या पत्राचे वाचन करुन बाबासाहेबांच्या पारिवारिक जीवन व पत्नी विषयी त्यांच्या मनात असलेल्या अपार प्रेमाची अनुभूती करुन दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांनी केले तर सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय जगताप यांनी केले व आभार डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड यांनी मानले. याप्रसंगी यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समितीचे सदस्य डॉ. गौतम दुथडे, डॉ. मिरा फड, डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

संथागार वृद्धाश्रमात

पुरोगामी विचाराचे एकमत



# विज्ञानवादी भारत हेच बाबासाहेबांचे ध्येय होते

## प्रबोधन व्याख्यानमालेत डॉ. इंगोले यांचे प्रतिपादन



नांदेड : प्रतिनिधी

**संपूर्ण जगात असे केवळ तीन महापुरुष आहे ज्यांचे तत्त्वज्ञान आंतरविरोधी नाही तर विज्ञानवादाशी सुसंगत आहे. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक असून विज्ञानवादी भारत हेच त्यांचे ध्येय होते, असे प्रतिपादन प्रा. डॉ.आदिनाथ इंगोले यांनी केले.**

यशवंत महाविद्यालयात आयोजित यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. यशवंत महाविद्यालयातील प्रबोधन व्याख्यानमालेत आंबेडकरवादात बुद्धिजीवी वर्गाची भूमिका या विषयावर ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे ह्या होत्या तर मंचावर या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील व यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ.संदीप पाईकराव यांची उपस्थिती होती. डॉ.आदिनाथ इंगोले पुढे बोलताना म्हणाले की, मैत्रीपूर्ण जीवन समता, बंधुता, न्याय आणि लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मैत्री असेल तर समता व बंधुता स्थापित होईल आणि समता स्थापन झाली तर लोकशाहीचे मूल्य मजबूत होतील. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय समाजसत्तावादी तथा विज्ञानवादी भारत निर्माण करणे हे होते. परंतु सध्याच्या काळामध्ये जातीयवाद आणि भांडवलशाही हे लोकशाहीचे शत्रू म्हणून समोर येत आहेत; तेव्हा बुद्धिजीवी वर्गाची भूमिका महत्त्वाची ठरते. समकालीन बुद्धिजीवी वर्गाची वर्गवारी करत असताना डॉ. इंगोले म्हणाले की, जगातील कोणत्याही उज्वल चळवळीच्या नाशास मध्यमवर्गीय बुद्धिजीवी जबाबदार असतो. बुद्धिजीवी वर्गाचे प्रमुख दोन प्रकार असून पहिला बुद्धिजीवी आहे, जो की आत्मकेंद्रित बनत चालला आहे. मी, माझा परिवार, माझा स्वार्थ यापुरताच तो मर्यादित आहे तर दुसऱ्या बुद्धीजीवी वर्ग प्रज्ञावंत वर्ग आहे. ज्यांना समाजाची जाणीव आहे समाजाच्या तळागळातील जनतेविषयी आस्था आहे त्यांच्या कल्याणासाठी व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायासाठी सदैव प्रयत्नरत राहणारा हा बुद्धिजीवी वर्ग आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, राजकारण वर्गीय जाणिवांचे असते. वर्गीय जाणिवेशिवाय राजकारण म्हणजे भोंदूगिरी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नेहमी समाजवादाची बाजू घेतली आणि प्रखर राष्ट्रवाद देशासमोर मांडला. मी प्रथमतः भारतीय आणि अंतिमतःही भारतीय आहे, हा बाबासाहेबांचा विचार विद्यार्थ्यांसमोर मांडला.

अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य डॉ. कविता सोनकांबळे यांनी केला. प्रास्ताविक व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांनी केले तर सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ. संजय जगताप यांनी केले व आभार डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड यांनी मानले. याप्रसंगी व्याख्यानमाला समितीचे सदस्य प्रा.गौतम दुथडे, डॉ.मिरा फड, डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड व महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

देशोन्नती

# विज्ञानवादी भारत हेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय होते-डॉ.इंगोले




देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ यशवंत महाविद्यालयात 'यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला' समितीतर्फे १५ एप्रिल २०२३ रोजी सकाळी १०.३० वा. इंग्रजी भाषा प्रयोगशाळा येथे डॉ.आदिनाथ इंगोले, सेवानिवृत्त प्राध्यापक व राज्यशास्त्र विभाग प्रमुख, गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय, पूर्णा यांचे 'आंबेडकरवादात बुद्धिजीवी वर्गाची भूमिका' या विषयावर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे माजी प्र- कुलगुरु तथा विद्यमान प्राचार्य डॉ. गणेशचन्द्र एन. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.कविता सोनकांबळे ह्या होत्या तर मंचावर उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील व यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ.संदीप पाईकराव यांची उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. संपूर्ण जगात असे केवळ तीन महापुरुष आहेत, ज्यांचे तत्त्वज्ञान आंतरविरोधी नाही तर विज्ञानवादाशी सुसंगत आहे. त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक आहेत, असे प्रतिपादन डॉ.आदिनाथ इंगोले यांनी केले.

Nanded Edition
Apr 18, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

गोदातीर समाचार

# विज्ञानवादी भारत हेच डॉ. आंबेडकरांचे ध्येय होते -डॉ. इंगोले



**नांदेड-** संपूर्ण जगात असे केवळ तीन महापुरुष आहेत, ज्यांचे तत्त्वज्ञान आंतरविरोधी नाही तर विज्ञानवादाशी सुसंगत आहे. त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक आहेत, असे प्रतिपादन डॉ. आदिनाथ इंगोले यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३२ व्या जयंतीनिमित्त यशवंत महाविद्यालयात आयोजित यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी उपप्राचार्या डॉ. कविता सोनकांबळे होत्या. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे, कार्यालयीन प्रबंधक संदीप पाटील व यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ.संदीप पाईकराव यांची उपस्थिती होती.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

डॉ. आदिनाथ इंगोले पुढे बोलताना म्हणाले की, मैत्रीपूर्ण जीवन समता, बंधुता, न्याय आणि लोकशाहीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मैत्री असेल तर समता व बंधुता स्थापित होईल आणि समता स्थापन झाली तर लोकशाहीचे मूल्य मजबूत होतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ध्येय समाजसत्तावादी तथा विज्ञानवादी भारत निर्माण करणे हे होते. परंतु सध्याच्या काळामध्ये जातीयवाद आणि भांडवलशाही हे लोकशाहीचे शत्रू म्हणून समोर येत आहेत. तेव्हा बुद्धिजीवी वर्गाची भूमिका महत्त्वाची ठरते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत प्रबोधन व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. संदीप पाईकराव यांनी केले. तर सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ. संजय जगताप यांनी केले व आभार डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड यांनी मानले.

याप्रसंगी यशवंत प्रबोधन व्याख्यानमाला समितीचे सदस्य प्रा. गौतम दुथडे, डॉ. मिरा फड, डॉ. ज्ञानेश्वर पुपलवाड व महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

Nanded Edition
Apr 19, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com